# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com
फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 349
दिनांक :- 20 एप्रिल, 2020

**संदर्भ** :- 1. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 15.04.2020.
2. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 15.04.2020.
3. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/323 दि. 15.04.2020
4. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 17.04.2020.

## -: आदेश :-

ज्याअर्थी राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13.03.2020 पासुन लागु करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी संदर्भिय क्रं. 1 चे केंद्र शासन व संदर्भिय क्रं. 4 अन्वये महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्याकडील आदेशान्वये कोरोना (कोव्हिड-19) चे संबधाने मार्गदर्शक निर्देश देण्यात आलेले आहे.

त्याअर्थी **मी. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 30 व साथरोग प्रतिबंधक अधिनियम 1897 नुसार मला प्राप्त अधिकारान्वये खालील बाबींचे पालन करण्यास आदेशीत करीत आहे.

**सार्वजनिक स्थळ (Public Spaces) :-**

1. सर्व सार्वजनिक ठिकाणी / कामाचे ठिकाणी मास्क वापरणे अनिवार्य राहील. सदर व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी मास्क न वापरल्याचे आढळुन आल्यास त्यांस रु. 200 /- दंड आकारण्यात यावा आणि 3 मास्क देण्यात यावे.
2. सार्वजनिक ठिकाणे, कामाची ठिकाणे, वाहतुकीचे ठिकाणांचे प्रभारी यांनी त्याठिकाणी सामाजिक अंतर (Social Distancing) चे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी तसेच भंग झाल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.
3. सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही संघटनेने/व्यवस्थापकाने 2 किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र जमण्याची परवानगी देऊ नये
4. सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-यास संबधीत प्राधिकरणाने कायदेशीर कार्यवाही करावी.
5. गुटखा, तंबाखु यांचे विक्रीवर बंदी असल्याने त्याचे सक्तीने पालन याची दक्षता घ्यावी तसेच भंग झाल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**कामाचे स्थळ (Work Spaces) :-**

6. सर्व कामाच्या ठिकाणी तापमान तपासणीसाठी (Temperature screening) ची पुरेशी व्यवस्था करावी व सोयीस्कर ठिकाणी हात धुण्याकरीता सॅनिटायजर्स ठेवावीत व हात धुण्यांच्या ठिकाणांची संख्या जास्त प्रमाणात ठेवावी.
7. कामाच्या ठिकाणी शिफट दरम्यान एक तासाचे अंतर ठेवावे तसेच कर्मचारी यांच्या जेवणाच्या वेळा ठरवुन द्याव्यात जेणेकरुन सामाजिक अंतराचे (Social Distancing) पालन होईल.
8. सर्व खाजगी व सार्वजनिक कर्मचारी यांना आरोग्य सेतु ॲपच्या वापरास प्रोत्साहित करावे.
9. सर्व संस्थांनी/उद्योगांनी त्यांचे कामाची जागा शिफट दरम्यान निर्जंतुकीकरण करुन घ्यावे.
10. मोठी संमेलने / बैठका प्रतिबंधीत कराव्यात.

**उत्पादक आस्थापना (Manufacturing Establishments) :-**

11. हाताळण्यात येणा-या पृष्ठभागांची वारंवार साफसफाई करणे आणि सर्वांना हात धुणे अनिवार्य राहील.
12. कॅन्टीनमध्ये सामाजिक अंतर (Social Distancing) चे पालन होण्याकरिता कामाचे शिफट व कर्मचारी यांच्या भोजनांच्या वेळांमध्ये overlap होणार नाही याची दक्षता घ्यावी.
13. चांगल्या स्वच्छता पध्दतींबाबत (good hygiene practices) सखोल संवाद व प्रशिक्षण आयोजित करावे.

उपरोक्त आदेशाचे कोणतीही व्यक्ती / संस्था/ संघटना यांनी उल्लंघन केल्यास त्यांचेविरुध्द दंडात्मक आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43 आणि भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**उपरोक्त आदेशातील दंडात्मक व फौजदारी कार्यवाही पोलीस विभाग, संबधीत महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायत प्रशासनाने करावी. तसेच दंड केलेल्या व्यक्तीस दंडाची कार्यवाही करणा-या विभागाने 3 मास्क दयावे.**

**सदरचा आदेश आज दिनांक 20 एप्रिल, 2020 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**

जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**(डॉ. कुणाल खेमनार)**
**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
4. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
5. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
6. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर